**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०९

**सभावृत्तांत**

**दिनांक – २२/११/२०१९** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षीक सभा **शुक्रवार** दिनांक **२२/११/२०१९** रोजी **दुपारी ३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.बाबासाहेब(बाबा)त्रिभुवन
४. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.६) महापौर चषक शालेय विविध क्रीडा स्पर्धा २०२० (Tee 20) या स्पर्धेत् स्हभागी होणारे मनपा शालेय विद्यार्थ्यांना किट (टि-शर्ट, पॅन्ट,बुट) देणेस मान्यता देणेबाबत.- मा.अभिषेक बारणे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७)गंगोत्री पार्क फिटनेस हॉल सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत. – मा.अभिषेक बारणे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड मनपा परिसरात रहात असलेले खेलरत्न् अर्जुन व शिवछत्रपती पुरस्कारार्थी यांचे निवासाकडे जाणेकामी दिशादर्शक फलक बसविणेबाबत. – मा.अभिषेक बारणे , म.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.अभिषेक बारणे अनुमोदक - मा.सागर गवळी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची शुक्रवार दिनांक २२/११/२०१९ ( दुपारी ३.०० वा.) ची पाक्षिक सभा शनिवार दिनांक ३०/११/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** – शनिवार दिनांक ३०/११/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **तुषार रघुनाथ हिंगे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०९

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २२**/**११/२०१९ (दु.३.००वा) ची तहकूब सभा **)**

दिनांक – **३०/११/२०१९** वेळ - दुपारी **४.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **२२/११/२०१९** ची तहकूब सभा शनिवार दिनांक ३०**/११/२०१९** रोजी दुपारी **४.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**

२. मा.अभिषेक गोविंद बारणे

३. मा.बाबासाहेब(बाबा)त्रिभुवन

४. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय मा.खोत – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ५२ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ३०/११/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४९५/२०१९ दि.१८/११/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कु.अधिराज किरण मगर रा.निगडी, ह्याने एशियन कुमार चॅम्पियनशीप २०१९ बिजिंग, चीन या स्पर्धेस जाऊन आल्याने सदर स्पर्धेसाठी त्याने कीट खर्च, विमान प्रवासभाडे, निवासखर्च, व्हिसा फी, इत्यादीसाठी स्वत:खर्च केल्याने म.न.पा नियमानुसार र.रु.१,२४,८५१/- च्या ७५% र.रु.९३,६३८/- (अक्षरी र.रु.त्र्यान्नव हजार सहाशे अडोतीस फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ५३ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ३०/११/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.बाबासाहेब त्रिभुवन अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४९६/२०१९ दि.१८/११/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कु.सुमित राहूल मोरे रा.प्राधिकरण, ह्याने एशियन कुमार चॅम्पियनशीप २०१९ बिजिंग, चीन या स्पर्धेस जाऊन आल्याने सदर स्पर्धेसाठी त्याने कीट खर्च, विमान प्रवासभाडे, निवासखर्च, व्हिसा

फी, इत्यादी साठी स्वत:खर्च केल्याने म.न.पा.नियमानुसार र.रु.१,२४,८५१/- च्या ७५% र.रु.९३,६३८/- (अक्षरी र.रु. त्र्यान्नव हजार सहाशे अडोतीस फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ५४ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ३०/११/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक– मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/५५८/२०१९ दि.१६/१०/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाची संत तुकारामनगर येथील संत तुकारामनगर सांस्कृतिक व्यायामशाळा हि हनुमान स्पोर्टस अकादमी चिखली यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.०२/१०/२०१९ रोजी संपृष्टात आल्याने व्यायामशाळेचा ठराव मंजूर झाल्यानंतर आदेशाच्या तारखेपासून मुदतवाढ देवून ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२,०००/- (अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ५५ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ३०/११/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.बाबासाहेब त्रिभुवन अनुमोदक– मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/५६६/२०१९ दि.१६/११/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाची पोलीस वसाहत व्यायामशाळा, कृष्णानगर, चिखली हि कै.गजानन म्हैत्रे प्रतिष्ठाण, म्हैत्रेवाडी चिखली यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.३०/११/२०१९ रोजी संपृष्टात आल्याने व्यायामशाळेचा ठराव मंजूर झाल्यानंतर आदेशाच्या तारखेपासून मुदतवाढ देवून ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२,०००/- (अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ५६ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ३०/११/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक– मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा /३ / कावि / ४८० /२०१९ दि.१६/११/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाची अण्णाभाऊ साठे भवनातील कै.मधूकर पवळे व्यायामशाळा हि हनुमान स्पोर्टस अकादमी, चिखली यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत दि.२५/०१/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने व्यायामशाळेचा ठराव मंजूर झाल्यानंतर आदेशाच्या तारखेपासून मुदतवाढ देवून ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२,०००/- (अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ५७ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ३०/११/२०१९

सुचक – मा. अभिषेक बारणे अनुमोदक– मा.सागर गवळी

संदर्भ – मा.अभिषेक बारणे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव

माहे जानेवारी २०२० मध्ये महापौर चषक शालेय विविध क्रीडा स्पर्धा २०२०(Tee 20) या स्पर्धेत सहभागी होणारे मनपा शालेय विद्यार्थ्यांना किट(अंदाजे ६००० विद्यार्थी)(टी-शर्ट,पँट, बुट) देणेस व त्याकामी होणा-या खर्चास मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभे कडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ५८ विषय क्रमांक – ०७

दिनांक – ३०/११/२०१९

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक– मा.सागर गवळी

संदर्भ – मा.अभिषेक बारणे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव

क्रॉस फिट टेनिस स्टार अकॅडमी,पुणे येथील नामवंत प्रशिक्षण देणारी संस्था आहे. गंगोत्री पार्क फिटनेस हॉल हा क्रॉस फिट टेनिस स्टार अकॅडमी या संस्थेस ११ महिने कराराने मनपा नियमानुसार दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----------

ठराव क्रमांक – ५९ विषय क्रमांक – ०८

दिनांक – ३०/११/२०१९

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक– मा.सागर गवळी


संदर्भ – मा.अभिषेक बारणे , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात खेलरत्न, अर्जुन, शिवछत्रपती पुरस्कारार्थी रहात आहेत. या पुरस्कारार्थी यांची माहिती नागरिकांना होण्याच्या दृष्टीने त्यांच्या निवासाकडे जाणेकामी दिशादर्शक फलक बसविणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात रहात असलेले व भविष्यात घोषित होणारे खेलरत्न, पद्मश्री, अर्जुन व शिवछत्रपती पुरस्कारार्थी यांचे निवासाकडे जाणेकामी दिशादर्शक फलक बसविणेस व त्याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **तुषार रघुनाथ हिंगे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५२९/२०१९
दिनांक :०२/१२/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.